महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ८२ वा | दिनांक : २३/१२/२०२४ | वार : सोमवार

## बिनकामाचे मंत्री मंत्रिमंडळात अन् कामाचा बाहेर : प्रकाश शेंडगे



**नाशिक :** राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना मंत्रिपद मिळाले नसल्याने त्यांच्यासह ओबीसी नेते देखील नाराज असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आज ओबीसी नेत्यांनी छगन भुजबळ यांची त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेत चर्चा केली. या चर्चेनंतर ओबीसी नेते प्रकाश अण्णा शेंडगे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

माध्यमांशी बोलताना प्रकाश शेंडगे म्हणाले, या सरकारमध्ये ओबीसींची संख्या जास्त आहे त्यामुळे हे सरकार ओबीसींचे सरकार म्हणायला हरकत नाही, अशी भूमिका जि सरकार मांडत आहे. पण हे सगळे जरी खरे असले तरी हा सगळा गाव आमच्या मामाचा आहे, त्यातला एक तरी कामाचा पाहिजे न. जो कामाचा आहे त्याला बाहेर काढले आणि जे बिनकामाचे आहेत त्यांना आत घेतले, अशी टीका त्यांनी केली आहे.

पुढे बोलताना प्रकाश शेंडगे म्हणाले, या १७ लोकांना आव्हान आहे त्यांनी आवाज उठवावा ओबीसींचा आणि जात जनगणनेचा प्रश्न सरकारकडे मांडून तो मंजुर करून घ्यावा. ३३ हजार याठिकाणी ओबीसींच्या राजकीय जागा गायब केल्या आहेत. त्यावर भाटीया कमिशनच्या माध्यमातून डल्ला मारण्यात आलेला आहे. या जागा परत आणण्यासाठी हे मंत्री काय करतात हेच आम्ही बघणार आहोत. आजच्या बैठकीत देखील आमचा निर्णय झालेला आहे की जोपर्यंत आमच्या ३३ हजार जागा पुन:स्थापित होत नाहीत, भाटीया कमिशनचा अहवाल रद्द होत नाही, कारण त्यांनी ओबीसींची ३७ टक्के संख्या सांगितली आहे. हा मोठा अन्याय आहे. त्यामुळे या सरकारने कुठल्याही परिस्थितीत स्थानिक निवडणुका घेऊ नयेत.

छगन भुजबळ यांच्या विषयी बोलताना प्रकाश शेंडगे म्हणाले, आम्ही भुजबळ साहेबांना म्हणालो आपण आमचे नेते आहात. आपला जो लढा आहे तो तुम्ही लढलात. जरांगे यांचे इतके मोठे वादळ या महाराष्ट्रात निर्माण झाले होते ते वादळ समर्थपणे हातळण्याचे काम हे आमच्या या नेतृत्वाने केले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील तमाम भटके विमुक्त असतील, ओबीसी असतील सगळ्या संघटनेच्या नेत्यांनी एकमताने ठाम निर्णय घेतला आहे की भुजबळ मंत्रिमंडळात असोत किंवा नसोत आम्ही त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असणार आहोत.

पुढे बोलताना प्रकाश शेंडगे म्हणाले, थोड्याच दिवसात आम्ही रस्त्यावरची लढाई देखील सुरू करणार आहोत. २४ तारखेला जरांगे यांचे आंदोलन सुरू होत आहे. त्याच्या समग त्याच्या तोडीसतोड ओबीसींचे आंदोलन देखील त्याठिकाणी सुरू होणार आहे. या सगळ्या लढ्याचे नेतृत्व भुजबळ साहेब केल्याशिवाय राहणार नाहीत. आमच्या आरक्षणाचे संरक्षण आम्हाला करावे लागणार आहे. हे जरी ओबीसीचे सरकार आले असले तरी देखील हे ओबीसीच्या आरक्षणाचे संरक्षण करू शकेल का यावर आम्हाला विश्वास नाही.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले होते की नवीन लोकांना संधी देण्यासाठी काही आमदारांना मंत्रिपद दिले नाही. त्यामुळे जे नाराज आहेत त्यांनी समजून घेतले पाहिजे, या विधानावर बोलताना प्रकाश शेंडगे म्हणाले, हे बघा शेर कभी बुढा नाही होता. हा (छगन भुजबळ) ओबीसीचा शेर आहे, हा कधी म्हातारा होत नाही. त्यामुळे तरुणांने म्हातारे होण्याची व्याख्या जी आहे ती छगन भुजबळ यांना लागू होत नाही. त्यामुळे आमची विनंती आहे की अजितदादांनी पुन्हा एकदा विचार करावा.

## आईकडे जावे की बापाकडे जावे अशी परिस्थिती : हिरामण खोसकर यांची प्रतिक्रिया





**नाशिक :** महायुतीचे मंत्रिमंडळ विस्तार झाल्यानंतर त्यात अनेक आमदारांना मंत्रिपद न मिळाल्याने त्यांनी उघडपणे आपली नाराजी व्यक्त करून दाखवली आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते आमदार छगन भुजबळ यांना देखील मंत्रिपदावरून डावलण्यात आले. यावरून भुजबळ यांनी देखील तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. यावर आता आमदार हिरामण खोसकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

हिरामण खोसकर म्हणाले, मी परवा छगन भुजबळ यांना भेटणार आहे. त्यांना विनंती करणार आहे की तुम्ही दोघे वरिष्ठ नेत्यांनी एकत्र राहिले पाहिजे. आमच्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यांना छगन भुजबळ देखील पाहिजे आणि अजित पवार देखील पाहिजेत. आमची परिस्थिती ही आईकडे जावे की बापाकडे जावे अशी झाली आहे. दोघेही नेत्यांना एकत्र आणण्यासाठी आम्ही शंभर टक्के प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी म्हंटले आहे.

पुढे बोलताना हिरामण खोसकर म्हणाले, अजित पवारांची तयारी आहे. छगन भुजबळ यांची समजूत काढण्यासाठी ते प्रयत्न करत आहेत. छगन भुजबळ यांना मंत्री पद नको आहे, अशी चर्चा ही चुकीची आहे. छगन भुजबळ यांचा पुनर्वसन नक्की होईल, छगन भुजबळ यांच्यावरील अन्याय खोडून काढावाच लागेल. केंद्रातील निधी आणण्यासाठी छगन भुजबळ यांच्यासारखा भक्कम नेता केंद्रात आवश्यक आहे. अजित पवार सुनील तटकरे प्रफुल पटेल हे एकत्र बसून त्यांना न्याय देतील.

माणिकराव कोकाटे यांना कृषिमंत्री पद मिळण्यावर देखील हिरामण खोसकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. हिरामण खोसकर म्हणाले, जिल्ह्याला दोन मंत्री पद दिली. त्यातील एक पद म्हणजे शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा कृषिमंत्री पद शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी कोकाटे यांच्या रूपाने चांगले नेतृत्व दिले. इगतपुरीतून देखील मी निवडून आलो त्याबद्दल सर्वांचे मी आभार मानतो. जिल्ह्यातील सातही जागा निवडून आल्यामुळे अजितदादा हे समाधानी आहेत. तसेच दोन मंत्र्यांच्या रूपाने नाशिकची जिल्हा बँकेचा प्रश्न देखील निकाली लागेल असा विश्वास हिरामण खोसकर यांनी केला आहे.

दरम्यान, छगन भुजबळ यांना मंत्रिपद मिळाले नाही यावरून आता राजकारणातील कट्टर विरोधक माणिकराव शिंदे यांनी भुजबळ यांना खोचक टोला लगावला आहे. माणिकराव शिंदे म्हणाले, सरकार येऊन सरकारमध्ये नसणे हा भुजबळ यांचा मोठा अपमान आहे. नियतीला कदाचित सरकार येऊन सरकारमध्ये नसणे हा मोठा अपमान त्यांना द्यायचा होता म्हणून कदाचित येवलामध्ये त्यांना विजय मिळाला. त्यांची लढत कशी झाली हे जनतेला माहीत आहे, असा खोचका टोला माणिकराव शिंदे यांनी लगावला आहे.



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २३ डिसेंबर २०२४

# कष्टकऱ्यांच्या जिंदगीची कहाणी... कन्नड येथे रंगले कविसंमेलन



**कन्नड (अरुण थोरात):** सहकार महर्षी बाळासाहेब पवार सा.वाचनालय कन्नड च्या वतीने दि.२२ डिसेंबर रोजी दूसर्या कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यात तालुक्यातील कवींनी सादरीकरण करीत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ कवयित्री पुष्पाताई दाभाडे, तर प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ साहित्यिक डॉ रमेश सुर्यवंशी, जेष्ठ पत्रकार डॉ यशवंत पवार, पत्रकार तथा वात्रटिकाकार विठ्ठल शिरसे यांची उपस्थिती होती.

संमेलनाचे प्रास्ताविक कवी संदिप वाकडे यांनी तर सूत्रसंचालन शुभदा देवरे यांनी केले. कवी संदिप वाकडे यांनी हमीभाव या कवितेतून शेतकर्यांच्या व्यथा मांडल्या, कवी सुदाम आगळे यांनी कन्हर्शन कविता सादर केली. पेरणीकार ज्ञानेश्वर गायके यांनी 'नेमक चुकल कुणाच' या कवितेतून नदी च्या व्यथा मांडत संवर्धनाचा संदेश दिला.

कवियत्री अनिता राठोड यांनी 'तू अशी झेपावना, तू अशी उंचावना' या रैप गीतातून स्त्रीयांनी जागृत होऊण झेपावण्याचे अवाहन केले. गोपाळ जाधव यांनी 'रगरगत्या उन्हात ही तू' ही कविता सादर केली.

कवी सुरेश औटे यांनी आपल्या कवितेतील,'कष्टकर्या च्या जिंदगीची, काय सांगावी कहानी, आभाळाच्या छताखाली त्याने अंथरली धरणी' शब्दांतून शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या. कवियत्री कल्पना चव्हाण यांनी 'उघडा डोळे बघा नीट' यातून मोबाईल चे दुष्परिणाम विशद केले.

ऋषिकेश आव्हाळे यांनी 'का घडत' बहुरंगी कवी लक्ष्मण वाल्डे यांनी 'साहित्याच्या पाळण्यात शब्द झाले बाळ' यातून साहित्याची महती नमूद केली. अमोल मोकासे यांनी 'जास्मिन' ही इंग्रजी कविता, नंदूलाल कुचे यांनी 'पैसा पैसा' अरुण थोरात यांनी 'कोणाचा हा भग्न दरबार' अशोक दूधकर यांनी 'अस हे बेभान वागणं' जेष्ठ पत्रकार तथा वात्रटिकाकार विठ्ठल शिरसे यांनी 'प्रियसी म्हणे प्रियकरा ला...' या वात्रटिकेतून वातावरण हास्यमय केले.

डॉ. रमेश सुर्यवंशी यांनी अहिराणी कवितांचे वाचन केले. अध्यक्षीय भाषणात पुष्पाताई दाभाडे यांनी तिफण परिवाराचे कौतुक केले. आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर गायके यांनी केले.

# जे.ई.एस. महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन

***जालना (प्रा.डॉ.राजेंद्र सोनवणे)** जे.ई.एस. महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने विद्यार्थी, शोधार्थी, शिक्षक, प्राध्यापकांठी दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी "हिंदी के योजना-परियोजनापरक आयाम" या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

हिंदी विषयाशी संबंधित विद्यार्थी, शोधार्थी, शिक्षक, प्राध्यापक, लेखक, प्रकाशक, शैक्षणिक संस्था, शोध संस्था, पुस्तकालय, प्रकाशन व्यवसाय, नियतकालिके प्रकाशन इत्यादिकरिता केंद्र सरकारच्या अनेक योजना आहेत. राष्ट्रीय चर्चासत्रे, कार्यशाळा, हिंदीतर भाषी हिंदी नवलेखक शिबिरे, व्याख्यानमाला इत्यादी आयोजनाकरिता आर्थिक तरतुदी केल्या जातात.

केंद्रीय हिंदी निदेशालय, नवी दिल्लीच्या आर्थिक सहकार्याने अनेक योजना, शैक्षणिक प्रकल्प राबवले जातात.

पुस्तक प्रकाशन, कोश निर्माण, अनुवाद, शोधयात्रांचा आजपर्यंत देशातील करोडो लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे. केंद्र सरकारच्या वतीने केंद्रीय हिंदी निदेशालय, नवी दिल्ली व केंद्रीय हिंदी संस्थान, आगराच्या माध्यमातून चालवल्या जाणाऱ्या आर्थिक योजनांची माहिती आपल्या भागातील विद्यार्थी, शोधार्थी, शिक्षक, प्राध्यापक तसेच शैक्षणिक कार्याशी संलग्न प्रत्येक व्यक्तिला मिळावी या उद्देशाने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेमध्ये केंद्रीय हिंदी निदेशालय, नवी दिल्ली व केंद्रीय हिंदी संस्थान आगराचे मा. निदेशक मार्गदर्शन करणार आहेत.

यासंबंधी अधिक माहितीकरिता कार्यशाळा संयोजक डॉ. नानासाहेब गोरे मो. क्र.९४२२२१९१८३ यांच्याशी संपर्क साधावा तसेच या कार्यशाळेत विद्यार्थी, शोधार्थी, शिक्षक, प्राध्यापक, लेखक, हिंदी प्रेमी तसेच हिंदीसेवी यांनी जास्तीत जास्त संखेने उपस्थित रहावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री व कार्यशाळा संयोजक डॉ. नानासाहेब गोरे यांनी केले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# येणेगूर कॅप्टन जोशी स्मारक विद्यालयात भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय गणित दिन साजरा



**मुरूम, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येणेगूर येथील कॅप्टन जोशी स्मारक विद्यालयात भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय गणित दिन साजरा करण्यात आले.

भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन श्री परमहंस शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देवराज बिराजदार, प्रशालेचे मुख्याध्यापक महेश हरके, गणित विभाग प्रमुख महेश खंडाळकर, प्रदीप शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच उमरगा गणित अध्यापक मंडळाच्या कार्यकारिणीवर प्रशालेतील गणित शिक्षक महेश खंडाळकर यांची निवड झाल्याबद्दल संस्था व प्रशालेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आले.

प्रशालेत गणित शैक्षणिक साहित्य प्रदर्शन व गणित रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आले होते. या वेळी कु. गायत्री भैरप्पा, मेहरून शेख, ज्योती जाधव, ऐश्वर्या घोरपडे, अंकिता बनसोडे, संध्याराणी कांबळे, गायत्री स्वामी, सौंदर्य येडगे या विद्यार्थ्यांनी गणित शैक्षणिक साहित्य प्रदर्शित केले.

तसेच गोपाळ गेडाम सर यांनी श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवनाबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख गोपाळ गेडाम सर यांनी केले. या कार्यक्रमासाठी श्री परमहंस शिक्षण संस्थेचे संचालक शंकर हुळमजगे, आनंदराज बिराजदार, शिक्षक सौरभ उटगे, व्यंकट बिराजदार, चंद्रकांत बिराजदार, अविनाश दुनगे, प्रवीण स्वामी, प्रा सुरेश जाधव, प्रा महादेव बिराजदार, गणेश जोजन, अप्पू मुदकण्णा, गोविंद मेडेबणे, पार्वती जगताप, कोमल कीर्तने, सुप्रिया झिंगाडे, आम्रपाली गायकवाड, शिवकन्या पांचाळ, व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २३ डिसेंबर २०२४


## देवेंद्र फडणवीस, शिंदे आणि पवार यांचा ड्रीम प्रोजेक्ट पूर्ण करणार : गुलाबराव पाटील



**जळगाव :** महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीने प्रचंड बहुमत मिळवत विजय मिळवला. यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली व अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांना उपमुख्यमंत्रिपद देण्यात आले आहे. त्यानंतर हिवाळी अधिवेशन देखील नागपूर येथे पार पडले आणि खातेवाटप देखील आता पार पडले आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार व मंत्री गुलाबराव पाटील यांना पाणीपुरवठा खाते देण्यात आले आहे. यानंतर त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

गुलाबराव पाटील यांनी पाणीपुरवठा खाते मिळाल्याने आनंद व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचा ड्रीम प्रोजेक्ट पूर्ण करणार असल्याचे म्हंटले आहे. ज्या योजना प्रलंबित आहेत त्या पूर्ण करणार असल्याचे देखील त्यांनी यावेळी आश्वासन दिले आहे.

गुलाबराव पाटील म्हणाले, माझ्याकडे पूर्वी असलेले खातेच पुन्हा मला मिळाला आहे. मला पुन्हा पाणीपुरवठा हे खाते मिळाल्याने आनंद झाला आहे. राज्यात पाणीपुरवठ्याच्या काही योजना या पूर्ण झाल्या आहेत. तर काही योजना अद्याप प्रलंबित आहेत. या पाच वर्षाच्या काळात पाणीपुरवठा योजनेचा मला अनुभव असल्याने प्रलंबित असलेल्या योजनांना गती मिळेल. तसेच ग्रामीण पाणीपुरवठा हा शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा विषय असतो. त्यामुळे माझ्यावर पुन्हा विश्वास टाकून मला हे खाते देण्यात आले, याचा आनंद आहे.

पुढे बोलताना गुलाबराव पाटील म्हणाले, ग्रीड मराठवाडा हा देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचा महाराष्ट्रातील स्वप्नातील सर्वात मोठा प्रकल्प आहे. मराठवाडा ग्रीड हा प्रकल्प ३० हजार कोटींचा आहे. केंद्राच्या मंजुरीच्या आशेवर त्याचा डीपीआर आम्ही तयार केला आहे. या योजनेमुळे मराठवाड्याचा पाण्याचा प्रश्न कायमचा मिटणार आहे. विशेष म्हणजे हा प्रकल्प पूर्ण झाल्यास आयुष्यभर माझेही नाव त्याला जोडले जाणार आहे. त्यामुळे पाणीपुरवठा खात्यात मला पुण्याचे काम करण्याची संधी मिळाली आहे, असे त्यांनी म्हंटले आहे.

राज्यात पाणीपुरवठ्याच्या जवळपास सर्व योजना पूर्ण करण्याचा निर्धार मी केला आहे. मात्र काही ठिकाणी ठेकेदारांच्या हलगर्जीपणामुळे पाणीपुरवठा योजनांची कामे हे संथ गतीने सुरू आहेत. मात्र आता जी कोणती कामे थांबले आहेत, त्या पुन्हा कशा सुरु करता येतील यासाठी प्रयत्न करणार असल्याचे देखील गुलाबराव पाटलांनी यावेळी म्हंटले आहे.

## शिक्षण मंत्री आता ग्रामीण भागातील शाळेतही दिसणार

**मालेगाव :** शिवसेना शिंदे गटाचे नेते दादा भुसे यांच्याकडे शालेय शिक्षण मंत्री पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. मंत्रिपदाचा कारभार स्वीकारल्यानंतर दादा भुसे यांनी प्रतिक्रिया दिली. शिक्षण मंत्री आता ग्रामीण भागातील शाळांमध्ये दिसेल, असे ते म्हणाले. नेहमीप्रमाणे शिक्षण विभागात रिझल्ट ओरिएंटेड काम तुम्हाला दिसेल, असा विश्वासही दादा भुसे यांनी व्यक्त केला.

सरकारचे खातेवाटप शनिवारी पार पडले. दादा भुसे यांच्याकडे शालेय शिक्षण मंत्रीपद देण्यात आले आहे. खातेवाटपानंतर कॅबिनेट मंत्री दादा भुसे आपला मतदारसंघ मालेगावात आज दाखल झाले. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी मंत्रीपदाबाबत भाष्य केले. शिक्षण विभागात रिझल्ट ओरिएंटेड काम दिसेल, असेही ते म्हणाले.

शालेय शिक्षण मंत्री आता ग्रामीण भागातील शाळेत दिसणार, तसेच शिक्षण विभागही विविध शाळांना भेट देताना दिसेल, असे नवनिर्वाचित शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे म्हणालेत. शिक्षण खाते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या अतिशय जिव्हाळ्याचे आहे. याबाबत त्यांनी मला कल्पनाही दिली होती. गरीबातील गरीब पाल्याला चांगले आणि उत्तम शिक्षण देणे अपेक्षित आहे, असे ते म्हणाले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## विधानसभेच्या निवडणुकीत उभे केलेच कशाला? छगन भुजबळ यांचा सवाल

**नाशिक :** मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील ज्येष्ठ नेते छगन भुजबळ हे नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. तसेच ओबीसी नेत्यांनी भुजबळ यांची त्यांच्या शासकीय निवासस्थानी जाऊन भेट घेत चर्चा देखील केली आहे. या नंतर छगन भुजबळ यांनी माध्यमांशी संवाद साधला आहे. यावेळी त्यांनी अनेक मुद्यांवर प्रतिक्रिया दिली आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार माणिकराव कोकाटे यांना मंत्रिपद मिळाले तसेच त्यांच्या स्वागतासाठी नाशिकमध्ये बॅनर लावण्यात आले होते. या बॅनरवर छगन भुजबळ यांचा फोटो मात्र वगळण्यात आला होता. यावर बोलताना छगन भुजबळ म्हणाले, लाखो गरिबांच्या हृदयात आपला फोटो असणे ही बाब माझ्यासाठी पुरेशी आहे.

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, मला मंत्रिमंडळाच्या बाहेर ठेवण्यामागे काहीतरी गौडबंगाल असल्याचे मत ओबीसी नेत्यांचे झाले आहे. ओबीसी समाजातील विविध नेत्यांनी आपली भेट घेतली आणि त्यांनी आपल्यासोबत असल्याचे सांगितले. तुम्ही बाहेर असल्याने आम्ही त्रस्त असल्याचे त्यांनी मला सांगितले, अशी माहिती भुजबळांनी दिली आहे.

छगन भुजबळ म्हणाले, मी लोकसभेची तयारी केली होती. पण त्यावेळी मला थांबवण्यात आले. त्यानंतर राज्यसभेच्या दोन जागांवर संधी होती. पण त्यावेळीही मला तुमची राज्यात गरज आहे असे सांगत थांबवण्यात आले. मग आता गरज संपली का? मंत्रिमंडळात तरुणांना संधी देण्यासाठी आपल्याला थांबवण्यात आल्याचे म्हटले जात आहे. पण तरुणपणाचे वय काय आहे? तरुणांना संधी द्या पण काही जागा सिनिअर लोकांसाठी ठेवायला हव्यात ना. आधीच सांगायचे ना विधानसभेला उभे राहू नका म्हणून, असे म्हणत त्यांनी त्यांची नाराजी स्पष्ट बोलून दाखवली आहे. राज्यसभेवर जा म्हणणे म्हणजे विधानसभेचा राजीनामा द्यावा लागेल. मग उभे केलेच कशाला? असा सवाल देखील त्यांनी अजित पवारांना उद्देशून केला आहे.

छगन भुजबळ म्हणाले, मी ओबीसींसाठी लढणारा नेता आहे. ३५ वर्षे ओबीसींसाठी लढतोय. मराठा समाजाचा द्वेष करत नाही. त्यांना वेगळे आरक्षण द्यावे अशी मागणी आहे. मी मराठा समाजाचा विरोधक नाही. पण तसे चित्र निर्माण केले गेले. ओबीसींसाठी लढताना कुठल्याही इतर समाजाच्या हक्कांवर गदा आणू दिली नसल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले आहे.